## या साध्या घरात माझ्या...

या घरात माझ्या, काही न आलिशान
साधेच खोपटाचे, सारवलेले छान ॥१॥

नाही नक्षीदार, कौलांनी कसेबसे झाकलेले
निजताना नजरेत त्यातून, चांदणे वेचलेले ॥२॥

नाहीत भिंती भक्कम, घुमणे वाऱ्याचे चाले
निवारा नसता किडा-मुंगी, त्यास आपले समजलेले ॥३॥

पावसाळ्यात बरसुनी तो, घरास नाहवून जातो
उन्हाळ्यात तोही घरास, असा तावून सुलाखून जातो ॥४॥

बैठेच स्वयंपाक चाले, नाही सोयी नव्या पूर्ण
चुलीवर भाजलेले, आगळेच अन्न ब्रह्मपूर्ण ॥५॥

नाहीत विजेच्या दिवे, रात्रीस किर्र अंधार असतो
देवाजवळ मिणमिणणारा, हर कोपरा उजाळत असतो ॥६॥

नाही फार बगीचा, नाही फार वनश्री ती
मोजकीच फुले अन्, तुळस वृंदावनी ती ॥७॥

इतरांसारखे नसेल टुमदार, मला फिकीर ना त्याची
आसरा निवारा घ्याया, ती माझी वास्तू हक्काची ॥८॥

या साध्या घरात माझ्या, काहीच ना चीजवस्तू
समाधान इतुकेच कि, देव म्हणे तथास्तु ॥९॥

© सचिन पु. कुलकर्णी
www.saarthbodh.com
FB ID - sachin.kulkarni78